मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जाहिरात होर्डिंगचे स्ट्रक्चर तपासून घ्या

## महापालिकेच्या होर्डिंगचालक व धारक तसेच, जाहिरादारांना सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात गेले दोन-तीन दिवसांपासून अवकाळी पाऊस हजेरी लावत आहे. त्यामुळे जाहिरात होर्डिंग कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. होर्डिंगच्या स्ट्रॅक्चरचे तपासणी करून घ्यावी. धोकादायक स्ट्रक्चरची दुरूस्ती करून घ्यावी, अशा सक्त सूचना महापालिकेने होर्डिंगचालक व धारक तसेच, जाहिरादारांना केली आहे. तसेच, होर्डिंग खाली नागरिकांनी थांबू नये, असे आवाहन महापालिकेने केले आहे.



शहरात विविध ठिकाणी, विविध आकाराचे आणि उंचीचे अवजड असे लोखंडी जाहिरात होर्डिंग उभारण्यात आलेले आहेत. प्रतिवर्षी वादळ, वाऱ्यामुळे असे जाहिरात होर्डिंग पडण्याचे प्रकार शहरात व शहराबाहेर घडलेले आहेत. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून महापालिकेने यापूर्वीच सर्व जाहिरातदार यांना मान्सुनपूर्व कालावधीत सर्व जाहिरात होर्डिंगची प्रत्यक्ष जागेवर जावून तपासणी करणे. त्याचे फाउंडेशन व्यवस्थित असल्याचे, होर्डिंगच्या लोखंडी सांगाड्यास गंज लागला नसल्याची खात्री करावी.

त्यास गंजरोधक रंग लावावा. एखादे होर्डिंग धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आल्यास तो तात्काळ ते पाडून घ्यावे. जाहिरात होर्डिंग वादळ, वाऱ्यामुळे पडणार नाही, यासाठीच्या सर्व उपाययोजना कराव्यात, अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

### होर्डिंगखाली थांबू नका

» नागरिकांनी अवकाळी पावसाच्या कालावधीत अशा जाहिरात होर्डिंगच्या सांगाड्याखाली किंवा होर्डिंगच्या आसपास थांबण्याचे टाळावे. आपली वाहने लावू नयेत. होर्डिंगखाली टपरी, हातगाडी, पत्राशेड लावून कोणी व्यवसाय करीत असल्यास ते ताबडतोब काढून घ्यावे. जेणेकरुन जीवित अथवा वित्तीय हानी होणार नाही. याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी केले आहे.

---

# महावितरणची प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावा

## प्रस्तावाला स्थायी समितीमार्फत मुख्य सभेने मंजुरी दिल्याने हा उपक्रम सुरू होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदारसंघातील महावितरण वीज पुरवठा सेवा सक्षम करण्यासाठी प्रशासनाने प्रस्तावित विकासकामे, शाखा विभाजन, उपकेंद्र उभारण्याच्या कामाला गती द्यावी, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

> भोसरी विधानसभा मतदारसंघ अंतर्गत विद्युत विषयक प्रलंबित कामांचा आढावा बैठकीत घेतला. प्राधान्याने मान्सूनपूर्व कामांना गती द्यावी. पावसाळ्यामध्ये खंडित वीज पुरवठ्याचा सामना नागरिकांना करावा लागू नये या हष्टीने उपाययोजना करण्याचेही सूचित केले. शाखा विभाजन, उच्च दाब वीज उपकेंद्र, मनुष्यबळ निर्मिती हे विषय मार्गी लागल्यास वीज पुरवठा सक्षम करण्यास मदत होणार आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करणार आहे. - **महेश लांडगे, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**



महावितरण संदर्भात विविध प्रलंबित विकास कामांसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळाचे संचालक विश्वास पाठक यांच्यासोबत मुंबईत बैठक घेण्यात आली. यावेळी मतदारसंघांतर्गत येणाऱ्या विद्युत विषयक कामांचा आढावा आमदार महेश लांडगे यांनी घेतला.

भोसरी मतदारसंघांमध्ये वीज पुरवठा खंडित होऊ नये यासाठी उपकेंद्रांची मागणी करण्यात येत आहे. हे उपकेंद्र उभारले जावेत यासाठी आज सूचना केल्या आहेत. मान्सूनपूर्वक कामांमध्ये विद्युत विषय कामांना प्राधान्य दिले जावे. जेणेकरून पावसाळ्यात पुढील चार महिने नागरिकांकडून वीज पुरवठा खंडित होण्याबाबत तक्रारी येऊ नये याची दक्षता घ्यावी अशी सूचना देखील करण्यात आली आहे.

सक्षमपणे बीज पुरवठा करण्याबाबत आवश्यक उपाययोजना आणि प्रस्तावित कामांना गती देण्याबाबत प्रशासन सकारात्मक आहे. याबाबत त्या-त्या विभागाकडे पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावण्याबाबत निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना संचालकांनी दिले आहेत.

**बैठकीमधील महत्त्वाचे मुद्दे :**

भोसरी मतदारसंघांमध्ये औद्योगिक तसेच घरगुती व्यावसायिक व इतर ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा व्हावा यासाठी उपकेंद्रांची उभारणी करण्यात यावी. चऱ्होली व मोशी शाखा विभाजन, मोशी सफारी पार्क येथील उच्चदाब वाहिनीसाठी उपकेंद्रसाठी जागेची उपलब्धता करणे, प्राइड वर्ल्ड सिटी येथील अति उच्चदाब उपकेंद्र जागा उपलब्धता, सेंचुरी ऐन्का येथे अतिरिक्त दोन रोहित्र उभारणे. मतदारसंघातील 22 KV रोहित्रांचे रूपांतर 11 KV रोहित्रांमध्ये करणे., आरडीएसएस योजनेतील प्रस्तावित कामे मार्गी लावणे. 353.94 कोटी रुपयांच्या डीपीआरला मंजुरीचा प्रस्ताव प्रलंबित आहे. त्याचा पाठपुरावा करणे, औद्योगिक क्षेत्रातील वीज समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना करणे, अशा महत्वपूर्ण मुद्द्यांवर बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली.

# पुणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन सज्ज

## जिल्ह्यात पाचशे आपदा मित्र आणि चारशे वन आपदा मित्रांना प्रशिक्षण



> जिल्ह्यातील प्रत्येक तालुकास्तरावर शोध आणि बचाव गट स्थापन करण्यतात आला असून, या गटाकडे विविध साहित्य देण्यात आले आहे. अतिवृष्टीच्या वेळी गावातील तलाठी आणि ग्रामसेवकांना उपाययोजना करण्याची सूचना करण्यात आली आहे. जिल्ह्यात पाचशे आपदा मित्र आणि चारशे वन आपदा मित्रांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.
>
> **- विठ्ठल बनोटे, प्रमुख, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग.**

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळ्यातील संभाव्य पूरपरिस्थिती आणि दुर्घटना टाळण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन सज्ज झाला असून, दरड आणि पूरप्रवण गावांतील कामे करण्यात आली आहेत. विविध शासकीय यंत्रणांना साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. तसेच, जिल्ह्यात पाचशे आपदा मित्र आणि चारशे वन आपदा मित्रांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

जिल्ह्यात साधारपणे जून ते सप्टेंबर या महिन्यात सरासरी ८६२ मिलिमीटर, तर जून ते ऑक्टोबर या कालावधीत सरासरी ९४० मिलिमीटर अशी पावसाची सरासरी आकडेवारी राज्य शासनाने निर्धारित केली आहे. त्या अनुषंगाने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच ग्रामीण भागासाठीच्या पूर्वतयारी बैठका घेण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यात ८४ पूर, तर ७२ दरडप्रवण गावे आहेत. त्यातील भोर तालुक्यातील मौजे कोंढरी आणि धानवली या गावातील अनुक्रमे ४० आणि १२१ कुटुंबांना पावसाळ्यात आवश्यकतेनुसार जवळील शाळेत स्थलांतर करण्यात येते. यंदा जास्त पावसाची शक्यता असल्याने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडा, तालुका आपत्ती व्यवस्थापन आराखडा, गाव आपत्ती व्यवस्थापन आराखडा आणि जिल्हा पूर नियंत्रण आरखडा करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

माळीण दुर्घटनेनंतर जिल्ह्यातील दरडप्रवण गावांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यामध्ये स्वतंत्र २३ गावे दरडप्रवण म्हणून निश्चित करण्यात आली होती. या गावांमध्ये संरक्षणात्मक कामे करण्यासाठी ३६५.२३ लाख रुपयांचा निधी राज्य शासनाकडून प्राप्त झाला आहे. या गावांपैकी मावळ तालुक्यातील ताजे, लोहगड, बोरज, तुंग आणि माळवाडी या पाच गावांमधील कामे पूर्ण झाली असून, भोर तालुक्यातील धानवली गावाचे काम पूर्ण झाले आहे. मुळशी तालुक्यातील भुसी आणि वेल्हा तालुक्यातील घोळ या दोन गावांमध्ये संरक्षणात्मक कामे करण्याची आवश्यकता नसल्याचा अभिप्राय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडून देण्यात आला आहे. आंबेगाव तालुक्यातील पाच गावांच्या पुनर्वसनासाठी ९० लाखांचा निधी वितरित करण्यात आला असून त्याबाबतची कार्यवाही संबंधित तहसीलदारांकडून सुरू करण्यात आल्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्रमुख विठ्ठल बनोटे यांनी दिली.

मौजे पोखरीअंतर्गत बेंढारवाडी आणि मौजे जांभोरी अंतर्गत काळवाडी या गावांमधील सपाटीकरणाच्या कामांसाठीही दीड कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

याशिवाय २४ बर बोट, ५ लाइट टॉवर, १२१ लाइफ जॅकेट, ९० दोरखंड २७ सर्च लाईट, १० सॅटेलाइट फोन ३०० सेफ्टी हेल्मेट, विविध आकारांचे ३३ टेण्ट आणि १३ फायल ब्लँकेट असे साहित्यही तालुके, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नगरपालिका, गृहसंरक्षक दल, अग्निशामक दल, नगर परिषदा यांना पोहोचविण्यात आले आहे.

# पुणे शहरात १०२ अतिधोकादायक वाडे, इमारती

## प्रस्तावाला स्थायी समितीमार्फत मुख्य सभेने मंजुरी दिल्याने हा उपक्रम सुरू होणार



> शहरातील अतिधोकादायक वाडे, इमारतींना बांधकाम विभागाने नोटीस बजावून तेथे राहू नये, असे सांगितले आहे. अतिधोकादायक वाड्यांचा भाग कोसळून दुर्घटना घडू शकते, अशा १३ वाड्यांचा भाग नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी काढून टाकण्यात आला आहे. ही कार्यवाही पुढे सुरूच राहणार आहे.
>
> **- प्रशांत वाघमारे, शहर अभियंता, पुणे महापालिका.**

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात १०२ अतिधोकादायक वाडे आणि इमारती असून, त्यांतील १३ वाड्यांचा भाग महापालिकेच्या बांधकाम विभागाने सुरक्षिततेच्या कारणास्तव उतरविला आहे. येत्या सात जूनपर्यंत शहरातील ५० ते ६० अतिधोकादायक वाड्यांचा भाग काढून टाकण्याचे नियोजन बांधकाम विभागाने केले आहे.

शहरात पावसाळा सुरू होण्यापूर्वी महापालिकेच्या वतीने दरवर्षी शहरातील धोकादायक वाडे, इमारतींचे सर्वेक्षण करून त्यांना नोटीस दिली जाते. महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात शहरात १०२ धोकादायक वाडे आढळले आहेत. त्यांना बांधकाम विभागाने नोटीस बजाविली. शहराच्या मध्य वस्तीत हे जुने वाडे आणि इमारती आहेत. त्यांच्या मालक व भाडेकरूंमध्ये वादविवाद असल्याने अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. त्यामुळे बहुतांश ठिकाणी कोणीही राहत नाही. न्यायालयात वाद सुरू असल्याने त्यांची देखभाल-दुरुस्तीही केली जात नाही. त्यामुळे हे जुने वाडे-इमारती अधिक धोकादायक बनले आहेत.

पावसाळ्यात हे वाडे पडण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे महापालिकेकडून दर वर्षी अशा मिळकतींचे सर्वेक्षण केले जाते. त्यानुसार या मिळकतींचे अतिधोकादायक, धोकादायक, कमी धोकादायक असे वर्गीकरण केले जाते. अतिधोकादायक इमारती तसेच वाडे सुरक्षिततेसाठी महापालिकेच्या वतीने उतरविले जातात. याचा खर्च संबंधितांकडून वसूल केला जातो. दर वर्षी मे आणि जून महिन्यात ही कारवाई केली जाते, अशी माहिती बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

महापालिकेच्या बांधकाम विभागाने केलेल्या सर्वेक्षणामध्ये शहरात १०२ अतिधोकादायक इमारती आणि जुने वाडे आढळले आहेत. त्यांपैकी ७७ ठिकाणी सध्या नागरिक राहत आहेत. या वाड्यांना महापालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाच्या (कलम १६० (ब) व (क)) अंतर्गत नोटीस बजावून हे वाडे त्वरित रिकामे करण्याचे आदेश दिले आहेत. आतापर्यंत महापालिकेच्या बांधकाम विभागाने शहरातील अतिधोकादायक असलेल्या १३ वाड्यांचा धोकादायक भाग काढून घेतला आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत उर्वरित अतिधोकादायक झालेल्या वाड्यांचा भागदेखील काढला जाणार आहे.

# पिंपरीत 941 जुन्या घरांचा होणार पुनर्विकास

## 350 चौरस फूट घरांऐवजी नागरिकांकडून मोठ्या घरांची मागणी; म्हाडाच्या परवानगीने खासगी विकसक घेणार काम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील संत तुकारामनगर येथील नऊ एकर भूखंडावर म्हाडाने ४० वर्षांपूर्वी बांधलेल्या ९४१ जुन्या घरांचा पुनर्विकास करण्यात येणार आहे. म्हाडाच्या नियमानुसार मिळणाऱ्या ३०० ते ३५० चौरस फूट क्षेत्रफळाच्या घरांऐवजी नागरिकांनी मोठ्या घरांची मागणी केली आहे. त्यासाठी म्हाडाच्या परवानगीने खासगी विकसकाकडून पुनर्विकास प्रकल्प राबवला जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना ९०० ते १२०० चौरस फूट क्षेत्रफळाची घरे मिळावीत, अशी मागणी केली आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) १९८५ मध्ये पिंपरीतील संत तुकारामनगर येथे दुमजली इमारती बांधून, २८० चौरस फूट क्षेत्रफळाची घरे निर्माण केली होती. आर्थिकदृष्ट्या कमी उत्पन्न गट (एलआयजी) आणि मध्यम उत्पन्न गटातील (एमआयजी) लाभार्थ्यांना ही घरे देण्यात आली होती. एलआयजी गटासाठीच्या घरांची किंमत २७ हजार रुपये, तर एमआयजी गटासाठीच्या घरांची किंमत ३७ हजार रुपये होती. या योजनेला तब्बल ४० वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. ही घरे सध्या जुनी, खिळखिळी व जीर्ण अवस्थेत झालेली आहेत. त्यामुळे म्हाडाने या घरांचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, म्हाडाच्या नियमानुसार मिळणाऱ्या ३०० ते ३५० चौरस फूट घरांबाबत नागरिकांची नाराजी असून नागरिकांनी अधिक मोठ्या घरांची मागणी केली आहे.

संत तुकारामनगर येथील म्हाडाची घरे काहींच्या नावावर नाहीत. काहींचे आईवडिलांचे निधन झालेले आहे. अशा तब्बल २५० नागरिकांची घरे नावावर करणे राहून गेले आहे. जुन्या घराचा पुनर्विकास करण्यापूर्वी घरे नावावर करून घेतली जाणार आहेत. त्यासाठी कागदपत्रे गोळा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. घरे नावावर केल्यानंतर अभिहस्तांतरण करार केला जाईल. त्यानंतर म्हाडाकडून विकसक नेमला जाईल



### गृहरचना संस्थेची स्थापना

» म्हाडाच्या सर्व लाभार्थ्यांनी एकत्र येऊन सामुदायिक बैठक घेतली. सोसायटी स्थापन करण्याच्या निर्णयावर ७१२ नागरिकांची स्वाक्षरी करून समंती दर्शविली. राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष यशवंत भोसले यांची मुख्य प्रवर्तक म्हणून नियुक्ती केली. त्यांच्या नेतृत्वाखाली म्हाडाने सोसायटी स्थापन करण्यास मान्यता दिली. त्यावर उपनिबंधक सहकार यांच्याकडे संत तुकारामनगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादीत अशी संस्थेची नोंदणी केली.

### म्हाडाच्या अध्यक्षांकडून पाहणी

» नागरिकांनी ९०० स्क्वेअर फुट घराची मागणी केल्यानंतर म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये संत तुकारामनगर येथील प्रत्यक्ष म्हाडाच्या घरांना भेट देऊन पाहणी केली. नागरिकांच्या व्यथा समजून घेऊन त्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. प्रशासनासोबत चर्चा करून मोठ्या घरांच्या मागणीचा विचार करुन योग्य निर्णय घेण्याबाबत त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला

### 60 टक्के नागरिकांचा प्रतिसाद

» संस्था स्थापन करून सभासद शुल्क जमा करून घेण्याची प्रक्रिया राबवण्यात आली. त्यास ६० टक्के रहिवाशांनी प्रतिसाद देऊन प्रत्येकी ६०० रुपये प्रमाणे शुल्क जमा केले. काहींनी ऑनलाईन, तर काहींनी स्वतः उपस्थित राहून पैसे जमा केले. नवीन नियमानुसार सोसायटीसाठी ५१ टक्के नोंदणी अपेक्षित असते. नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याचे पाहून उपनिबंधक सहकार यांनी सोसायटीला अधिकृत प्रमाणपत्र प्रदान केले.

“ संबंधित गृहरचना संस्थेला खासगी विकसक शोधावा लागेल. संस्था आणि विकसक यांचे घराच्या क्षेत्रफळावर एकमत आल्यानंतर, त्यांना बांधकाम करण्यास परवानगी दिली जाईल. ही प्रक्रिया यशस्वीपणे राबविल्यास नागरिकांना मोठी घरे मिळतील. यातून वाढीव एफएसआय मिळून विकसकाचा फायदा होईल. म्हाडाला मिळणारा एफएसआय वापरून निर्माण केलेली घरे लॉटरी काढून नवीन लाभार्थ्यांना वाटप केली जातील.

**- शिवाजीराव आढळराव पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**

# आपत्कालीन परिस्थितीसाठी यंत्रणा सज्ज ठेवा

## आयुक्त शेखर सिंह यांचे निर्देश – मान्सूनपूर्व तयारीचा घेतला आढावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा सरासरी पेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता लक्षात घेऊन महापालिकेच्या सर्व विभागांनी आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी. तसेच आपत्तीपूर्व सूक्ष्म नियोजनावर भर द्यावा, असे निर्देश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी गुरूवारी (दि. २२) दिले. महापालिकेतील दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात झालेल्या मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठकीत आयुक्त सिंह बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.




शहरामध्ये ज्या ठिकाणी पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर साचते, अशी ठिकाणे तात्काळ शोधून काढून तेथे कायमस्वरुपी उपाययोजना करा. पालिकेच्या रुग्णालयांमध्ये विद्युत पुरवठा खंडित होणार नाही, यादृष्टिने नियोजन करा. शहरातील धोकादायक इमारतींना नोटीस देण्यासोबतच तेथील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षितस्थळी हलवण्याचे नियोजन करा. पूरजन्य परिस्थितीमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना राहण्यासाठी शाळांचे नियोजन करा. नदीकाठी असणाऱ्या घरांमध्ये पाणी शिरण्याचा धोका असल्याने अशा नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्याचे नियोजन करा, असेही निर्देश आयुक्त सिंह यांनी यावेळी दिले.


तसेच आकाशचिन्ह विभागाने शहरातील अनधिकृत व धोकादायक होर्डिंग तातडीने काढून घ्यावेत. दोन दिवसांमध्ये हे काम पूर्ण करण्यात यावे. शहरात नालेसफाईच्या सुरू असलेल्या काम तात्काळ पूर्ण करावे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये प्रत्येक विभागाने एकमेकांशी समन्वय ठेवावा. क्षेत्रीय अधिकारी यांनीही त्यांच्या प्रभागात आपत्कालीन यंत्रणा सक्षम करावी, असे निर्देशही आयुक्त सिंह यांनी दिले. आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल यांनी यावेळी पालिकेने मान्सूनपूर्व केलेल्या तयारीची माहिती दिली.

### नागरिकांच्या मदतीसाठी पथके राहणार कार्यरत

» पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीमध्ये तात्काळ मदत मिळावी, यासाठी जलद प्रतिसाद पथके कार्यरत करण्याबाबत आयुक्त सिंह यांनी निर्देश दिले आहेत. या पथकांमध्ये आपत्ती व्यवस्थापन, अग्निशमन, आरोग्य, विद्युत, स्थापत्य, उद्यान अशा विविध विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश करून रात्रीच्यावेळी देखील ही पथके कार्यरत ठेवावेत, असेही आयुक्त सिंह यांनी सांगितले.

# निवडणुका जुन्याच गटांवर की नवीन प्रभागरचनेनुसार?

## नागरिकांसह जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी इच्छुकांच्या नजरा



पुणे | प्रतिनिधी

जिल्ह्याचे मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणार्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने, या निवडणुका होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये थेट जनतेतून निवडून येण्याची संधी निर्माण झाली आहे. त्यामुळे जुन्याच गटांवर निवडणूक होणार की नवीन प्रभागरचनेनुसार निवडणूक होणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

हवेली तालुक्यातील 23 गावे पुणे महापालिकेत समाविष्ट झाल्याचा मोठा फटका हवेली तालुक्याला बसला आहे. त्यामुळे येणारी निवडणूक ही किती गटात होणार याचे गणित महायुती सरकारवरच अवलंबून आहे. त्यामुळे महायुतीचे व महाविकास आघाडीचे कार्यकर्ते जुन्या गटानुसार अंदाज बांधून नवीन गट रचनेनुसार आपले 'स्थानिक'चे राजकीय फासे फेकताना दिसत आहेत. लोकसंख्येच्या निकषानुसार, जिल्हा परिषद सर्कल व पंचायत समिती गण वाढणार का कमी होणार याची चर्चा अद्याप सुरु आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत 2022 पूर्वीच्या ओबीसी आरक्षणानुसार या निवडणुका घ्याव्या, असे आदेश देत सध्या सुरू असलेल्या याचिकांवर जो काही निकाल येईल, तो निर्वाचित सर्व सदस्यांना लागू राहील, असेही न्यायालयाने निकालात म्हटले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेवर मार्च 2022 पासून प्रशासक राजवट सुरू आहे. त्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासक म्हणून कामकाज पाहत आहेत. तसेच पंचायत समित्यांचा कारभारही प्रशासकाकडे असून कामकाज गटविकास अधिकारी पाहत आहेत. निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने, या निवडणुका होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये थेट जनतेतून निवडून येण्याची संधी निर्माण झाली आहे. त्यामुळे जुन्याच गटांवर निवडणूक होणार की नवीन प्रभागरचनेनुसार निवडणूक होणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### निवडणुकांत सर्वच पक्षांचा लागणार कस

» 2022 मध्ये शिवसेना व त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर राज्याच्या राजकारणात जसे आमूलाग्र बदल झालेत. तसेच जिल्ह्यात, तालुक्यात देखील शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसची दोन गटांत विभागणी होऊन कार्यकर्ते विभागले गेले. अडीच वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या नसल्याने समीकरणे तर बदललीच सोबतच प्रत्येक पक्षाची मतपेढी देखील बदललेली असल्याने सर्वच राजकीय पक्षांचा या निवडणुकीत राजकीय कस लागणार आहे.

### जुन्या व नव्या गटानुसार फासे

» महाविकास आघाडी सरकारच्या काळात राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे जिल्हाधिकारी कार्यालयाने जिल्हा परिषदेसाठी 82 गट तर, पंचायत समित्यांसाठी एकूण 164 गण निश्चित केले होते. यामुळे जिल्हा परिषदेचे नवीन 7 गट आणि पंचायत समित्यांचे नवीन 14 गण वाढले होते. हवेली तालुक्यातील तब्बल 7 गट आणि 14 गणांवर संक्रांत आली होती. नवीन रचनेत हवेली तालुक्यात आता केवळ 6 गट आणि 12 गण निश्चित झाले होते.

### प्रस्थापितांना बसणार धक्का !

» अडीच वर्षांपासून जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका रखडल्या असून प्रशासकराज आहे. त्यामुळे त्या-त्या मतदारसंघातील अगोदर असलेल्या पदाधिकाऱ्यांचे राजकीय वजन कमी झाले. संपर्क न ठेवल्याने तेथील राजकीय समीकरणे देखील बदलून गेल्यामुळे प्रस्थापितांना पुन्हा नव्याने तेथे जम बसविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करावे लागणार आहेत.

# खरीप हंगामासाठी विविध प्रकारचे बियाणे उपलब्ध

## शेतकऱ्यांना आवश्यक असणारे विविध प्रकारचे बियाणे उपलब्ध आहेत, अशी माहिती संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर घोडेकर यांनी दिली.



पुणे | प्रतिनिधी

आंबेगाव तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लिमिटेड मंचर यांच्या वतीने खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना आवश्यक असणारे विविध प्रकारचे बियाणे उपलब्ध आहेत, अशी माहिती संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर घोडेकर यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित पुणे यांच्याकडील दर्जेदार इंद्रायणी, समृद्धी, भोगावती भात बियाणे आणि जे एस 335, फुले किमया केडीएस 753 व फुले किमया केडीएस 726 सोयाबीन बियाणे विक्रीसाठी संघाच्या डिंभे, घोडेगाव व मंचर डेपो येथे उपलब्ध झालेले आहे.

बियाणे साठा मर्यादीत उपलब्ध असून सद्य परिस्थितीत पाऊस समाधानकारक झालेला असला तरी देखील कृषी खात्याचा सल्ला घेवूनच शेतकऱ्यांनी पेरणी करण्याचा निर्णय घ्यावा, संघामध्ये सर्व प्रकारची रासायनिक खते व मिश्रखत खते विक्रीस उपलब्ध असल्याची माहिती खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर घोडेकर यांनी दिली.

आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शरद सहकारी बँकेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या सहकार्याने खरेदी विक्री संघाने नव्यानेच पशुखाद्य खरेदी विक्रीचा व्यवसाय सुरू केला आहे. यामध्ये बैलगाडा शर्यतीमध्ये धावणाऱ्या बैलांसाठी व दूध उत्पादन व्यवसाय करत असलेल्या शेतकऱ्यांसाठी दर्जेदार पशुखाद्य योग्य व वाजवी किमती मध्ये खरेदी विक्री संघाने विक्रीसाठी घोडेगाव, मंचर, निरगुडसर, लोणी, धामणी, पारगाव व रांजणी येथे उपलब्ध केलेले आहे.

खरीप हंगामामध्ये तालुक्यातील शेतकऱ्यांनी फक्त युरीया खरेदीसाठी संघामध्ये न येता सर्व प्रकारची रासायनिक खते बी बियाणे संघातून खरेदी करावी, शेतकऱ्यांनी खरेदीची पक्की पावती घेणे गरजेचे आहे. खरेदी करण्यासाठी येताना सोबत आधार कार्ड घेऊन येणे गरजेचे आहे. असे आवाहन खरेदी विक्री संघाचे उपाध्यक्ष सोपानराव नवले यांनी केले आहे.

### पशुखाद्य खरेदी विक्री

» आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शरद सहकारी बँकेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या सहकार्याने खरेदी विक्री संघाने नव्यानेच पशुखाद्य खरेदी विक्रीचा व्यवसाय सुरू केला आहे. यामध्ये बैलगाडा शर्यतीमध्ये धावणाऱ्या बैलांसाठी व दूध उत्पादन व्यवसाय करत असलेल्या शेतकऱ्यांसाठी दर्जेदार पशुखाद्य योग्य व वाजवी किमती मध्ये खरेदी विक्री संघाने विक्रीसाठी घोडेगाव, मंचर, निरगुडसर, लोणी, धामणी, पारगाव व रांजणी येथे उपलब्ध केलेले आहे